MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Issue-17, Vol-06, Jan. to Mar.2017

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G. Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR, Dist. Nanded



https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

27) संघराज्य आणि प्रादेशिक राजकीय पक्ष
प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव, जि.नांदेड || 107

28) महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील मुलभुत सोयी सुविधांचे .....
प्रकाश कांबळे, यवतमाळ, || 111

29) नाशिक येथील श्री काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह व समता सैनिक दलाच्या कार्याची वाटचाल
प्रा. डॉ. अविनाश फुलझेले, नागपूर, श्री. प्रेमराज बारीकराव खोब्रागडे, चंद्रपूर. || 113

30) भारत देशातील वाढणारी तरूणांची आत्महत्या प्रवृत्ती
प्रा. श्री. कोल्हे तुकाराम त्र्यंबकराव, औरंगाबाद || 118

31) दुर्बल घटकात न्याय, स्वातंत्र्य, समतेची पेरणी करणारे फुले, शाहु, आंबेडकर
प्रा. सतिष गोवर्धन पेटकर, चंद्रपूर || 121

32) भारतातील मागास प्रवर्गाची उच्च शिक्षणातील स्थिती
प्रा. दिलीप जीवन रामटेके, चंद्रपूर || 125

33) १९४२ चे चले जाव आंदोलन (अमृत महोत्सवी वर्ष)
सूर्यवंशी राजेंद्र हिरामण, लातूर || 128

34) रयतेचा राजा शिवाजी महाराज — एक महान सेनानी
डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी, ठाणे || 132

35) समकालीन दौर का दस्तावेज - 'कारोबार'
सपना सावईकर, गोवा || 135

36) बुक्सा जनजाति की सांस्कृतिक—सामाजिक समस्याएं
डॉ. मकरन्द भट्ट, चिमनपुरा (शाहपुरा) || 137

37) जीवनानुभूति का भावस्पर्शी अविष्कार — बहिणाबाई चौधरी की कविता
प्रा.दिलीप पंडीत पाटील, जलगांव || 139

38) स्पीकर पद की ऐतिहासिक पृष्टभूमि व तुलनात्मक अध्ययन
डॉ. आर. के. पुरोहित, श्रीमती रेणुका शर्मा, छत्तीसगढ. || 141

39) हिन्दी कविता का आर्थिक पक्ष और प्रेम
डॉ. ललित कुमार, जालोर || 144



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® | Jan. To Mar. 2017
Issue-17, Vol-06 | 0107

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR — ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY

27

# संघराज्य आणि प्रादेशिक राजकीय पक्ष

प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड

**प्रस्तावना :**

जागतिक स्तरावर राज्यव्यवस्थेने प्रदीर्घ प्रवासाची यात्रा पुर्ण केली. या दरम्यान राजकीय अनुभव व विविध प्रयोगाने त्यास समृध्द बनवले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनानंतर निर्माण झालेल्या भारतीय, राज्यघटनेने भारतासाठी संघराज्याचे स्वरुप स्विकारले आहे. मोर्ले मिंटो सूधारणा सायमन कमिशन अहवाल नेहरु रिपोर्ट १९३५ चा कायदा इ.संधात्मक प्रक्रियेच्या विकासाचे प्रारंभिक टप्पे होते. भारतीय घटनाकारांनी संविधान निर्मितीच्या काळात संयुक्त राज्य अमेरिका, कॅनडा, स्वीत्झर्लंड,ऑस्टेलिया आणि सोव्हिएत संघ इ. महत्त्वपुर्ण संघराज्याच्या अभ्यास केला होता. परंतु त्यांचा स्विकार, जसाच तसा केला नाही. कारण भारतीय समस्यांचे स्वरुप वेगळे होते. द भारत एक बहुभाषीक बहुजातीय व विभिन्न धर्मांचा देश होता. आज ही आहे. तसेच फाळणीच्या पुर्वी आणि सोबतच घडलेल्या सांप्रदायीक दंगलीतून निर्माण झालेली असहिष्णू परिस्थिती, अन्नाचे संकट, शरणार्थिच्या विस्थापनाचा प्रश्न, राष्ट्रीय एकात्मता राखणे, सामाजिक व आर्थिक विकासास गतीमान करण्याची समस्या होती. या समस्यांचा निपटारा सिंध्दाताचा आधार घेवून होवू शकत नाही. त्यामुळे घटनाकारांनी राष्ट्रीय चरित्राच्या हितास अनुकुल संघराज्याचा स्वीकार केला.

**संशोधनात्मक आराखडा :**

मे २०१६ आणि २०१५मध्ये अनेक राज्यातील विधानसभेच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकात जनतेने अधिक प्रमाणात प्रादेशिक पक्षालाच मान्यत दिली. दोन वर्षापुर्वी लोकांनी केंद्रात राष्ट्रीय पक्षाच्या बाजुने कौल दिला तर राखीव निवडणूकीत प्रादेशिक पक्षांना पसंती असे का घडले ? हे समजून घेण्याच्या भावनेने या शोध लेखाची रचना तयार झाली. भारतीय जनता राष्ट्रीय आणि प्रादेशिक प्रश्न ते सोडवण्यासाठी आवश्यक सक्षम केंद्र शासनाची गरज लागते हे समजून घेण्याइतपत सक्षम बनत चालली आहे. हे गृहित धरुन या शोध निबंधाची मांडणी केली. या शोध निबंधाच्या माध्यमातून संघराज्य शासनव्यवस्थेला प्रसंगावधानानुसार सक्षम व कमकुवत करण्यात प्रादेशिक पक्षाने आले योगदान कसे बजावले हे जाणून घेण्याच्या उद्देशाने या शोध निबंधास पुर्णरुप देण्यात आले. या शोध निबंधास पुर्ण करण्यासाठी उपलब्ध झालेल्या प्राथमिक साधनसामुग्रीसह दुय्यम साधनसामुग्रीचाही वापर करण्यात आला.

गार्नरच्या मते संघात्मक राज्यात सर्व शासकीय शक्ती केंद्रीय शासनात विभाजीत असते. ज्यांना मिळून संघ बनतो. सत्ता विभाजनाचे कार्य राष्ट्रीय संविधानाव्दारा केले जाते किंवा त्याची निर्मिती करणाऱ्या मुलभूत कायद्याव्दारे डायीसीच्या मते संघराज्य हे राष्टींय एकात्मता आणि राज्याच्या अधिकारात मेळ बसवणारी पध्दत म्हटले आहे.

मॉन्टेस्क्युने ब्रिटेनच्या शासन व्यवस्थेचे संघराज्याच्या दृष्टीने अभ्यासले. त्यांनतर ऑस्ट्रेलिया कॅनडा आणि रशियात त्याचे मान्यता स्वरुप नजरेस आले. भारतात ही संघराज्याच्या मिश्रित स्वरुपामुळे जी.एन. जोशीनी त्यास अर्धसंघ आणि डी.डी. बसू ने पुर्णत: एकात्मक किंवा पुर्णत: संघात्मक नाही असे म्हटले. तर दुसरीकडे एलेक्ज एण्ड्रोविजच्या मते - भारतीय संघराज्य कायदयाच्या दृष्टीने पुर्ण संघ आहे. कारण जे तत्त्व अणि लक्षणे संघात्मक व्यवस्थेत असावी ती सर्व लक्षणे भरतीय व्यवस्थेत स्पष्टपणे आहेत. परंतु त्याचे ही ही मत आहे. की, राज्याच्या तुलनेत केंद्राची बाजू अधिका शक्तिशाली आहे. नार्मन डी. पामरच्या मते भारतीय लोकशाही एक संघ आहे. तर त्यांचे एक वेगळे वैशिष्टय आहे. ज्यांनी सघात्मक स्वरुपात आपल्या पध्दतीने स्विकारले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतीय संविधानाची निर्मिती करणाऱ्या संविधान सभेने संविधान सभेने संविधानाच्या स्वरुपास संघात्मक म्हणताना हे एक संघीय संविधान मानले. केंद्र आणि राज्य दोघांची स्थापना संविधानाव्दारेच झाली. दोघांची शक्ति व अधिकाराचा स्त्रोत संविधानच आहे. आपल्या अधिकार क्षेत्रात कोणी कोणाच्या अधीन नाही. एकाचे अधिकार दुसऱ्यास पुरक आहेत.

लहान-लहान सार्वभौम राज्याव्दारे आपसात मिळून एक सार्वमान्य सरकारात कायम करण्यातून मिळून एक सार्वमान्य सरकारात कायम करण्यातून संघराज्य बनले हा सर्वश्रुत इतिहास आहे. सर्वसाधारण पणे शासनाची निर्मिती सैनिक व आर्थिक सुरक्षेसाठी करण्यात आली. भारतीय संघराजय त्यास अपवाद आहे. येथे देश आणि जनतेला प्रशासनाच्या सुविधासाठी विभिन्न राज्यात विभागले गेले. दोश अखंडपुर्व आहे. त्यामुळेच भारतीय संविधानाच्या पहिलया कलमात राजयाचा संघ हा शब्द प्रयोग करण्यात आल. ज्याचे स्पष्टीकरण देताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर म्हणतात. मसुदा समितीमार्फत या शब्दाचा वापर भारत एक संघराज्य आहे हे स्पष्ट करण्यासाठी करण्यात आला. परंतु हे संघराज्य कोणत्याही प्रकारे राज्यांच्या पारपांरिक करारांचा परिणम नाही. त्यामुळे कोणत्याही राज्यास संघातून वेगळे होण्याचा अधिकार नाही.



Scanned by CamScanner

भारतीय संघराज्य व्यवस्थेत राज्यांच्या राजकारणाचे वेगळे महत्व आहे. भारतीय लोकशाही ची यशस्वीत यावर अवलंबून असते की, आम्ही आमच्या विकास कार्यक्रमास कोणत्या गतीने क्रियान्वित करतो. संविधान व्दारा विकास कार्यक्रमाशी संबंधित सर्व अधिकार राज्यातच देण्यात आले. जमीन सुधारणा कायदा असो किंवा शिक्षणात बदल करण्याचा कार्यक्रम,कुंटूब नियोजन असेल किंवा दारुबंदी,कुटीरोद्योगास प्राधान्य देणे असो की जसलंधारणाच्या व्यवस्था हे सर्व कार्य राज्य शासनामार्फतच केले जातात. राज्य शासन आम जनतेच्या दैनंदिन समस्यांचे समाधान करते या इतर वीनरच्यामते संघात्मक व्यवस्थेत राज्याच्या महत्वास स्पष्ट करताना म्हटले. भारतीय संघराज्य व्यवस्थेत राज्य महत्वपुर्ण घटक आहेत. ज्यांच्या मार्फत खेडे शहर आणि नगराच्या राजकारणास राष्ट्रीय राजकीय व्यवस्थेसोबत जोडण्याचे कार्य केले जाते. वास्तवतेत राज्य राष्ट्रीय राजकारणाच्या आधारशिला असतात. वर्तमानकाळात राज्याच्या राजकारणात प्रादेशिक पक्षाची भुमिका महत्वुपुर्ण बनली. उदा : २०१५ ची बिहार, विधानसीा निवडणूक मे. २०१६ ची पश्चिम बगाल, केरळ, तामिळनाडू, विधानसभा निवडणूकांचा निकाल.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारणात भारतीय राष्ट्रीय कॉग्रसने, स्वातंत्र्य, आंदोलनात आग्रणी भुमिका घेतल्यामुळे एका दिर्घकाळपर्यंत राष्ट्रावर एकछत्री शासन केले. साम्यवादी पक्ष, भारतीय जनता पक्ष भारतीय जनसंघ, समाजवादी पक्ष यांच्या उदय राष्ट्र पक्ष म्हणून झाला. परंतु ते कॉग्रेसची जागा होवून शकले नाहीत. १९५२ ते १९६७ पर्यंत कॉंग्रेसचे देशात प्रभुत्व होते. केंद्र आणि राज्यात कॉग्रेसचेच शासन होते. त्यावेळी राज्य शासनाची स्थिती केंद्राच्या तुलनेत कमकुवत व नगन्य होती. पंरतु १९६० च्य मध्यपासून या स्थितीत बदल होवून लागला. चमत्कारीक नेतृत्व राजकारणाच्या परिदृश्यातून विलुप्त होत आहेत. जनतेच्या इच्छेला पुर्ण करणारी विकास योजनांची असफलता स्पष्ट होवू लागली. विभत्र राजकीय इच्छाशाली मध्यम वर्गाच्या उदय झाला. शेतीचा विकास झाल्यामुळे एक श्रीमंत शेतकरी वर्गाचा उदय झला. जे राज्यस्तरावर आपल्या हितांच्या सुरक्षित ठेवण्याचे इच्छुक होते. याशिवाय तथाकथित राष्ट्रीय पक्षांत गटबाजीचा उदय झाला. ज्यामुळे प्रादेशिक राजकीय पक्षाचा उदय झाला. आपल्या सांस्कृतिक वैशिष्टयांना कायम ठेवण्याच्या दच्छेनेच द्रविड मुनेत्र कउगम, ऑल इंडिया, अनना द्रविड मुत्रेत्र कउगम, अकाली दल, झारखंड मुक्ति मोर्चा, असंग गण परिषद आणि मणिपुर पिपल्स पार्टी बनल्या. तर काही प्रमुख समस्यासाठी भारतीय क्रांती दल, बंगला कॉग्रेस, उत्कल कॅग्रेस, केरळ कॉग्रेस, तमिल नलीला कॉग्रेस, तृणमूल कॉग्रेस,तेलंगाना फॉवरवर्ड ब्लॉक किसान मजदुर पार्टी, मुस्लिम लिंग, सिल्किम संग्राम परिषद इ. प्रादेशिक पक्ष बनले. जे विचाराधारा आणि लक्ष्याच्या आधाराने राष्ट्रीय पक्ष समान आहेत. परंतु आपले ध्येय आणि काही प्रकरणाच्या बाबतीत ते आपलया प्रदेशापर्यंतच्या मर्यादित राहिले. सर्व प्रादेशिक प्रख स्वायत्ता व महत्वपुर्ण आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाने चाळीसपेक्षा अधिका राजकीय पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता दिली. राजकीय दृष्टया या प्रदेशिक पक्षांना केंद्रीककरणाच्या विरुध्द आणि संघाच्या संघासोबत आपली लय मिळवणाऱ्या एका आंदोलनाच्या रुपात पहाता येईल.

याच काळात डॉ. राममनोहर लोहिया यांनी बिगूर कॉग्रेसी पक्षाना मिळवण्याचा प्रयत्न केला. डॉ. लोहियाच मते होते की, निवडणुकीत कॉग्रेसच्या विजयाचे कारण की, बिर कॉग्रेसी पक्षातील एकतेचा अभाव त्यामळे वाभाविनक्त व्यापक प्रमाणात संघटित कॉग्रेस पक्षाच्या विरोधासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्रित मिळून सामाना करण्याचा निर्णय घेतला. १९६७ च्या निवडणूकीत विरोधी पक्षांना व्यापक यश मिळाले. या कॉग्रेस विरोधवादाचे सर्वात मोठे नेते लोहियाच होते. त्याबद्दल राज्यशास्त्रज्ञ रजनी कोठारी म्हणतात. कॉग्रेसच्या एकाधिकारशाहीला नेस्तानाबुद करण्यासाठी देशांतग्रत सर्व कॉग्रेस विरोधी शक्तीनां एकत्रित करण्याच्या पध्दती व तंत्रात स्वतःस समर्पित केले होते.

१९६७ च्या काळात लोहिया भारतीय राजकारणाला कॉग्रेस विरुध्द कॉग्रेस विरोधी दिशेने वाटण्यात यशस्वी झाले होते. केरळ ओरिसा, मध्यप्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, आणि मद्रासच्या विधानसभेत कॉग्रेसला बहुमत मिळाले नाही. तसेच कॉग्रेसची जागा कोणत्याही एका पक्षाने न घेता अनेक लहान-लहान पक्ष समुह आणि अपक्षाती घेतली. तामिळनाडूचा अपवाद वगळता गठन झाले. पंजाब, बिहार, आणि उत्तरप्रदेशातील विरोधी शासनाअंतर्गत स्वतंत्र पार्टी, जनसंघ, बीकेडी, सोशॅलिस्ट आणि सी.पी.ईचा समावेश हेता. पंरतु सी.पी. आई,सरकारात शामिल झाले नव्हते. तरी त्याने त्यांना सक्रिय समर्थन दिले. अशा प्रकारे ही शासने विचाराधारात्मक दृष्टया विषम होती.

दक्षिणपंथी-वायपंथी किंवा धम्रनिरपेक्ष सांप्रदायिक विभाजन या आघाडीत जवळ-जवळ पुर्णपणे समाप्त झाले होते. तामिळनाडूतील डी.एम.के. आणि ओरिसातील स्वतंत्र पार्टीने बनवलेल्या शासनास वगळून सर्व आघाडी शासने आपल्या सहकारी पक्षातील विषमतेमुळे नेहमी तनाव आणि आर्थिक कारणाने पीडित होती. संयुक्त मोर्चाच्या सर्व शासनाने पारस्परिक सहकार्य एक न्युनतम कार्यक्रम बनवला. सर्व पक्ष प्रशासनातून भ्रष्टाचार नष्ट करावा. आणि जमाखोटी व नफेबाजीच्या प्रवृत्तीस नष्ट करावे यावर सहमत होते. विभिन प्रदेशात धोरणाबाबत निर्णय घेण्याचे नवनवीन मार्ग विकसति करण्यात आले. पंरतु तरीही धोरणाबाबत ऐक्य आणि एकात्मतेच्या अभावामुळे मोर्चात स्थिरता आली नाही. १९७० च्या अंतापर्यंत बिहारमध्ये सात सरकार उत्तरप्रदेशात चार, हरियाणा-मध्यप्रदेश, पंजाब आणि पश्चिम बंगाल



Scanned by CamScanner

तीन, केरळात देन सरकारे बदलली. याच काळात सात राज्यात राष्ट्रपती शासनाचे आठ घटना घडल्या. नव्या शासनाचे गठन आणि पुन्हा शासनास पाडण्याच्या खेळात प्रादेशिक पक्ष आणि अपक्षांची भुमिका अधिक महत्वाची ठरली.

याच काळात केंद्रशासनाने गमावलेल्या सत्तेला प्राप्त करण्यासाठी राज्यपालाचे पद आणि कलम ३५६ च्या आणिबाणीच्या तरतुदीचा पुन्हा-पुन्हा दुरुपयोग करण्यास प्रारंभ केला. वास्तवेत १९६७ ते १९७२ दरम्यान भारतीय संघराज्यात अधिक महत्वाचे तनाव जाणवले. ज्या राज्यात प्रादेशिक पक्षाने कॉग्रेसला हटवून सत्ता मिळवली. याच राजकीय पक्षांनी अनेक स्तरावर केंद्र राज्य सबंधाच्या प्रश्नांना उचलून धरले.

१९६९ मध्ये तामिळनाडू सरकारने केंद्र-राज्य संबंधाच्या प्रश्नांची तपासणी करण्याच्य हेतून राजामन्नार समितीची स्थापना केली. या समितीच्या शिफारशीनी संविधानातील सातव्या सुचीला पुर्नव्यवस्थित करण्याची शिफारस केली. राज्यांना आवश्यक सत्तेचे हस्तांतरण करावे. वित्त आयोग आणि योजना आयोगात संशोधन कलम २४९ ला समाप्त करावे आणि कलम ३५६ वर पुर्नविचार करणे इ. १९७७ मध्ये पश्चिम बंगालच्या वामपंथी शासनाने केंद्र-राजय संबंधावर एक स्मरणपत्र प्रकाशित केले. जयात त्यांनी विखंडनकारी प्रवृत्तिना रोखण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक मानले. तसेच नव्या राज्याची निर्मिती, त्यांच्या समिा आाि प्रदेश तसेच राज्याच्या नावात बदल करण्यासाठी प्रभावित राज्याची स्विकृती घेणे अनिवार्य आहे. १९७८ च्या अकाली दलाच्या आनंदपूर प्रस्तावानुसार केंद्राची सत्ता फक्त सुरक्षा, परराष्ट्र धोरण, संचार रेल्वे आणि मुद्रा यविषयापुरतीच मर्यादित असावी तसेच इतर सर्व अधिकार राज्यांना मिळावेत. १९८० च्या दशकात प्रादेशिक राजकीय पक्षांचे महत्त्व वाढल्यामुळे राज्य स्वायत्तेची मागणी तीव्र पध्दतीने उठवण्यात येत आहे. त्यांचा अंदाज होता की, राष्ट्रीय एकात्मतेस टिकण्यासाठी आणि सुदृढ करणारी प्रक्रिया म्हणून देशात विद्यमान बहुस्तरीय भित्रतांना स्वीकृत करावे लागेल. प्रादेशिक स्तरावर विद्यमान विभिन्नतांच्या वास्तविक आणि तर्कसंगत समाधानासाठी स्थानीय क्षमतांचा वापर करावा लागेल. याबाबत अधिक व्यापक प्रमाणात टिका झाल्यामुळे केंद्र शासनाने केंद्र-राज्य प्रशासकीय नात्यांच्या अभ्यासासाठी १९६७ ला प्रशासकीय सुधारणा आयोगाची स्थापना केली.

या आयोगाने आपल्या शिफारशीत राज्यांना अधिकतम प्रशासकीय अधिकार देणे आणि संविधानातील कलम २६३ अंतर्गत आंतरराज्य परिषदेचे गठन करण्याची आवश्यकता असण्याच्या सल्ला दिला. परंतु आयोगाच्या शिफारशी लागू केल्या नाहीत. केंद्रीकरणाची प्रक्रिया राबवण्यात आली.

जनता पक्षाच्या अल्पावधीतील केंद्र सरकार मौखिक दृष्टया विकेंद्रीकरणाच्या धोरणाप्रती वचनबध्द होती. परंतु व्यवहारात काहीच बदल करुशकली नाही. प्रामुख्याने १९८० मध्ये दशकात संघराज्याचा प्रश्न राष्ट्रीय प्रश्नाच्या रुपाने ज्वलंत प्रश्न म्हणून पुढे आला. तेव्हा केंद्र आणि राज्यात राजकीय आव्हानानी नवीन प्रकारचे आयाम आणि तनावाचे रुप ग्रहण केले होते. तेव्हा स्थितीला साधारण करण्याच्य हेतून सरकारिया आयोगाचे शिफारशीचा आधार होता की, विद्यमान संवैधानिक सिध्दांत आणि व्यवस्था सदृढ असावी. सरकारिया आयोगाने राज्यपालाची नियुक्ति, कलम ३५६ अंतर्गत आणिबाणी व्यवस्थेचा प्रयोग आर्थिक संसाधनाचे वितरण आणि संविधानाचे कलम २६३ अंतर्गत आंतरराज्य परिषदेची स्थापना करावी इ. महत्वपुर्ण शिफारशी केल्या. परंतु सरकारिया आयोगाच्या सर्व शिफारशीना लागू करण्यात आले नाही. परंतु १९९० मध्ये आंतरराज्य परिषदेची स्थापना करण्यात आली. प्रादेशिक पक्षाचे वाढते महत्व मग ते राज्य किंवा केंद्र शासन व राजकारणातील असो लक्षात घेवूनच हा निर्णय घेण्यात आला. ज्यामुळे केंद्रामार्फत राज्यात हस्तक्षेप करने आणि आपली इच्छेला राज्यावर थोपवण्याच्या प्रवृत्तीचे प्रमाण कमी झाले या बदलत्यायुगात राष्ट्रीय धोरण निर्धारणाच्या दृष्टिने अनेक राजकीय उपलब्धियाँ सिंधू झाल्या आसाम, मेघालय, मणिपूर, त्रिपुराचा विकास अणि सुरक्षेत ताळमेळ बसवण्यासाठी उत्तर पुव्र परिषदेची स्थापना करण्यात आली. हिमाचल प्रदेश आणि मेघालयाला पुर्ण राज्याचा दर्जा देण्यात आला. मिझोरमला एक विधानसभा आणि मंत्री परिषद देवून दर्जा उंचावण्यात आला. जानेवारी १९७२ मध्ये उत्तर पुर्व क्षेत्रात मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश हे दोन संघीय प्रदेश बनवण्यात आले. ऑगस्ट १९७२ मध्ये उत्तर पुर्वी परिषद नावाया एक उच्चस्तरीय परिषद बनवण्यात आली. ज्यात प्रदेश आणि प्रशासकीय घटकातील प्रतिनिधी सहभागी होते. तलंगनाच्या समस्येला सोडवण्यात आले. १९७५ मध्ये ३६ व्या घटनादुरुस्ती मार्फत सिक्कीमला भारतीय संघराज्याचा २२ वा राज्य बनवून सिक्कीमच्या जनतेच्या आशेला पुर्ण करण्यात आले.

या काळात अर्ध्यापेक्षा अधिक राज्यात विरोधव्दारा शासन केली जात होते. तरी संघीय शासनप्रणाली कार्यरत होती. राज्यस्तरावर प्रादेशिक पक्षाने सत्ता मिळवली. पंरतु केंद्रात काँग्रेस सत्ते होती. १९७१ च्या मध्यावधी निवडणूकीने केंद्राच्य दुर्बलतेच्या युगाला समाप्त केले. १९६९ मध्ये कॉग्रेसचे विभाजन झाले होते. काँग्रेस विभाजनानंतर श्रीमती इंदिरा गांधीने आपल्या राजकीय कौशल्याच्या आधारे आपली स्थिती मजबूत केली. ज्यामुळे त्यांना १९७० च्या निवडणूकीत विजय मिळवता आला.

कालांतराने जयप्रकाश नारायणांनी प्रादेशिक आकांक्षा आणि सत्तारुढ पक्षाची वाढती निरंकुशतेविरुध्द आंदोलन छेडले. तत्काळात आर्थिक परिस्थिती स्पष्टपणे कमकुवत झाल्यामुळे असंतोष निर्माण



Scanned by CamScanner

झाला. आर्थिक मंदी, वाढती बेरोजगारी, वाढती महागाई आणि अन्न धान्यांची कमतरता इ.मुळे गंभीर संकट निर्माण झाले. जयप्रकाश नारायणांच्या समग्र क्रांतीने संपूर्ण देश प्रभावित झाला. शासनामार्फत संविधानातील कलम ३५२ अंतर्गत आणिबाणीच्या स्थितीची घोषणा करण्यात आली. जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, आचार्य कृपलानी सारख्या अनेक नेत्यांना जेलमध्ये टाकण्यात आले. त्यामुळे अचानक राष्ट्रीय राजकारणात भुकंप निर्माण झाले.

जानेवारी १९७७ साली अचानक निवडणूकीची घोषणा करण्यात आली. संपूर्ण क्रांतीच्या घोषणेअंतर्गतच ऐतिहासिक सर्वसाधारण निवडणूकीत कॉंग्रेसच्या ३० वर्षांच्या एकाधिकार शासनास नष्ट केले केंद्रात जनता पक्षाचे सरकार बनले. या सरकारचे नेतृत्व करणारे मोरारजी देसाई, बाबु जगजीवन राम आणि श्री चौधरी चरणसिंह हे पुर्वाश्रतीचे कॉंग्रेसचेच होते. चौधरी चरणसिंहाच्या नेतृत्वाखाली केंद्रीय शासनाच्या रुपात २९ जुलै १९७९ ला प्रथमच केंद्रात आघाडी शासन तयार झाले. याने केंद्रात पहिल्यांदा आघाडी शासनाची पार्श्वभुमी तयार केली. त्यात अन्नाद्रमुक पण सहभागी होते. परंतु नंतर यातून एक-एक पक्ष बाजूला झाले. त्यामुळे या शासनाने संसदेचा विश्वास गमावला.

राष्ट्रीय स्तरावरील आघाडी शासनाचा हा पहिला प्रयोग अस्थिर राहिला. १९८० च्या ७ व्या लोकसभेच्या मध्यावधि निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाला जनतेनी अभुतपुर्व यशस्वी केले. ही स्थिती थोडयाच कालावधीसाठी राहिली. परंतु प्रादेशिक पक्षानी आपल्या भुमिकेतून कॉंग्रेसच्या एकछत्री शासनावर लगाम लावली. राष्ट्रीय स्तरावर आघाडी शासनाच्या परंपरेचा प्रारंभ झाला.

१९९१ मध्ये श्री नरसिंहरावच्या नेतृत्वात शामिल अल्पमत कॉंग्रेस शासनाने पाच वर्षानंतर पुन्हा संसदीय निवडणूकीना भारतीय राजकारणात आघाडी शासनाच्या स्थितीवर आणून उभा केले. एप्रिल १९९६ ला ११ व्या लोकसभेची निवडणूक झाली. या निवडणूकीने सर्व बाजुने त्रिशंकु संसदेला जन्म दिला. भारतीय जनता पक्ष व मित्र पक्षांना १९४ जागा मिळाल्या. कॉंग्रेसला फक्त १४० जागा मिळाल्या. या निवडणूकीत प्रादेशिक पक्ष प्रादेशिक शक्ती आणि लहान गटांच्या सामुहिक शक्तित अधिक वाढ झाली.

तेव्हापासून आता २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाच्या शासनालाच लोकांनी स्पष्ट बहुमत दिले. परंतु या पक्षाचे राज्यसभेत स्पष्ट बहुमत नसल्यामुळे अनेक निर्णय आणि विधेयक पास होत नाहीत. एका बाजुने कॉंग्रेसमुक्त भारत अभियान भाजपा राबवते तर दुसऱ्या बाजूने सर्वच क्षेत्रातून नरेंद्र मोदी आणि आरएसएसला तीव्र विरोध होत आहे. तर २०१५ बिहार विधानसभा निवडणूक दिल्ली विधानसभा निवडणूक मे २०१६ मधील पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ या राज्यातील विधानसभा निवडणूकांनी प्रादेशिक पक्षाचा राजकीय प्रभावाला स्पष्ट केले. २६ मे २०१६ ला अनेक इलेक्ट्रॉनिक मिडियातील चॅनलनी सर्व्हे केला असता लोकांनी नरेंद्र मोदीच्या नेतृत्वास आणि त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीस भरघोस मान्यता दिल्याचे जाणवते. परंतु हिच जनता आसामचा अपवाद वगळता नरेंद्र मोदीच्या नेतृत्वास राष्ट्रीय राजकारणात स्विकारुन भारतीय जनता पक्षाकडे सत्ता न देता स्थानिक प्रादेशिक पक्षाकडे सत्ता देते. यातच भारतीय लोकशाहीचे गमक आहे असे मला वाटते.

प्रादेशिक पक्षाच्या वाढत्या वर्चस्वाविषयी अनेक पातळीवर भारतीय राजकारणात चर्चा होत आहे. काहीजण त्यातील गुण-दोषावर भर देतात. तर काहीजण राष्ट्रीय पक्षाच्या अयशस्वीतेतून आणि जनतेच्या प्रश्नाला प्राधान्य देवून प्रभावीपणे काम करण्याच्या प्रादेशिक पक्षाच्या कामकाज पध्दतीवर चर्चा करतात. याचा अर्थ याविषयी आपणास मतभिन्नता जाणवते. प्रादेशिक पक्ष भारताच्या विशाल विविधता राजकीय अनेकसत्तावाद संवैधानिक लोकशाहीच्या परिपक्वतेच्या दिशेने अग्रेसर होणाऱ्या स्वस्थ व समृध्द राष्ट्राची ओळख आहे.

भारतीय लोकशाही व्यवस्थेत उदया येणारे विकासाचे नवनवीन क्षेत्र आपणास विकासाच्या शिखरवर आणि मागासलेपणाच्या खाईतपण होवून जावू शकतात. या दोघात निर्माण होणारी विषमता येथील लोकांत कमीपणाची भावना उत्पन्न करते. ज्याचे रुपांतरण शासनप्रति असंतोष निर्माण होण्यात होते. त्यामुळे सर्वच प्रदेशात संतुलित विकास व्हावा हे राज्यव्यवस्थेचे उत्तरदायित्व आहे. उलट विकासाच्या खालच्या स्तरावर असलेल्यांची विकासाची मागणी अतिशयोक्तीची नाही. तसेच ती अनैतीक ही नाही. कारण समाजाच्या विकसाचे वारेकरी बनणे आणि त्यातील आपला वाटा मागणे हा सर्वांचा अधिकार आहे. यादृष्टोने विचार करता कोणताही भाग/प्रदेश आपल्या मागासलेणास दुर करण्यासाठी तत्पर असते. लोकशाहीसाठी हा एक शुभ संकेत आहे. प्रादेशिक पक्ष संबंधित क्षेत्रात राहुन त्याच्या विकासासाठी विधानसभा आणि संसदेत संघर्ष करतात.

आपल्या मागण्या प्रभावीपणे मांडतात. त्यापुणं करुन घेण्यासाठी शासनावर दबाव टाकतात. परंतु त्यांचा हा आवाज दुसऱ्या प्रदेशाच्या विकासाच्या मागणी आड येत नाही. तर हे फक्त देशाच्या संविधानातील नैतिक आणि सर्वसमावेशक भावनांना आपले विचार आणि कार्यक्रमातून समृध्द करतात. त्यातून प्रादेशिक पक्षाच्या सकारात्मक राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष आणि बहुजन पक्ष इ. हे असे पक्ष आहेत. जे पश्चिम बंगला,बिहार आणि उत्तरप्रदेशच्या प्रादेशिक इच्छांना राष्ट्रीय दच्छेच्या अनुरुप करुन राजकीय अभियानास जिवंत ठेवतात. द्रविडमुनेत्र कडगम, अन्नरद्रमुक, तेलगु देशम, अकाली दल सारखे प्रादेशिक राजकीय पक्ष कोणत्याही अर्थाने प्रदेशवादाचे



Scanned by CamScanner

AGAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

घटक नाहीत हे पक्ष पृथकतावाद आणि संकीर्णतावाद या प्रादेशिक उन्मादास नाकारतात.

अलिकडेच छत्तीसगढ, झारखंड, उत्तराखंड आणि तेलंगनाची स्थापना झाली. देशाच्या पुर्वोत्तर आणि पश्चिमोत्तर भागातही राज्याचे पुर्नगठंन झाले राज्याचे हे पुर्नगठंन प्रादेशिकतावादाऐवजी दुर्लक्षित क्षेत्राच्या विकासाच्या मांगणीतून झाले. प्रदेशवादाची भावना इतर भागातील लोकांच्या मनात अनावश्यक व्देष, कटुता आणि शंका उत्पन्न करते. तर राष्ट्रीय एकात्मतेची संस्कृती आणि भावनात्मक बंधुत्वावर संकट आणते. अशा भावनिकतेच्या आधारावर जर संघटित संघटना आपल्या प्रतिनिधीत्वास सत्तेशी जोडते. तेव्हा निश्चय ही प्रादेशिक राजकीय पक्षाच्या रुपाने त्याचा उद्देश आणि लक्ष्य गॉधळ निर्माण करते यास प्रादेशिक राजकीय पक्षाची नकारात्मक बाजू म्ळणावे लागेल.

याबाबत ए. एम. वचंने सहकारी संघवादाच्या स्वरुपाची मांडणी केली. सहकारी संघराज्यात संघ आणि प्रादेशिक शासनाची अधिकाधिक निर्भरता ज्यात प्रादेशिक अस्मिता आणि हिंताची पुर्ततेसोबत संघीय तत्वपण जीवंत रहतात. या दोन्ही शक्ती सोहार्दपुर्ण वातावरणात अन्न क्रिया करत राजकीय एकता आणि सांस्कृतिक विविधतेते सामंजस्य व संतुलन बनवतात. पी. चिदंबरम यांनी सहकारी संघराज्याचा विचार राजकीय शब्दावलीत पुन्हा समाविष्ट केला. जेव्हा ते १९९६-९८ च्या संपुक्त मोर्चा शासनात वित्तमंत्री होते. त्यांच्या मते प्रादेशिक राजकीय पक्ष जनसामान्याच्या जवळचे आहेत. ते भारताच्या विकासासोबत राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेस स्थैर्य आणि बलशाली बनवण्यास तत्पर असतात.

जस जसे राजकीय क्षेत्रात शासन व्यवस्था प्रतिनिधीत्वपुर्ण होत जाते. म्हणजेच प्रत्येक स्तरावरील जनतेच्या आशा-आकांक्षा पुर्ण होतात. तसतसे लोकशाही मुळधर असते. त्याचप्रकारे जनतेच्या विभिन्न वर्गाच्या भागीदारीत परिवर्तन होत जाते. या परिवर्तनाचा शासनप्रणालीस प्रभावित करण्यावर अधिक प्रभाव पडतो. त्यामुळे आम्ही संघराज्याचे या दृष्टिकोनातून मुल्यांकन करावे. त्याचे मुळ स्वरुप नसतानाही मिश्रिम स्वरुप एक पारदर्शक राज्यव्यवस्थेस संबंधित सुसज्जित आणि संचलित करते.

संदर्भ ग्रंथ :

१) भारत का संविधान एक परिचय - बसु दुर्गादास प्रिटंस हाल ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली.

२) कास्ट ॲन्ड पॉलिटिक्स इन इंडिया - कोटारी रजनी ओरिएन्टल लोगमेन मुंबई-१९७०

३) पार्लमेन्टरी डेमोक्रसी ऑफ इंडिया-के.सुब्बाराव - द वर्ल्ड प्रसे प्रा.लि. कलकत्ता - १९६१

□□□

28

# महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील मुलभुत सोयी सुविधांचे विश्लेषणात्मक अध्ययन.

प्रकाश कांबळे, यवतमाळ,
Ph.D. Scholar

**********

कॉमनवेल्थ गेम, आशियायी खेळ, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळ याकडे युवक आकर्षित झालेले दिसून येतात. क्रीडा क्षेत्र व शारीरिक शिक्षण याकडे सर्वच युवकांचे लक्ष वेधले गेले आहे. म्हणूनच उच्च दर्जाचे खेळाडू तयार करण्याकरिता त्याच दर्जाचे शारीरिक शिक्षण शिक्षक व प्रशिक्षक तयार करणे व तो अभ्यासक्रम परिणामकारक राबविणे आवश्यक आहे. त्याकरीता प्रत्येक शारीरिक शिक्षण महाविद्यालयात मुलभुत सोयी सुविधा असणे अंत्यत गरजेचे आहे.

शाळा महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या सर्वच खेळाचे ज्ञान शारीरिक शिक्षण शिक्षकाला असणे अपेक्षीत आहे. त्याकरीता या शिक्षकाला प्रशिक्षीत करणाऱ्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयात या सर्व खेळाचे मैदाने व क्रीडा साहित्य, मुलभुत सोयी सुविधा तसेच प्रशिक्षक असणे गरजेचे आहे. एन.सी.टी.ई. च्या नियमानुसार बी.पी.एड. प्रशिक्षण महाविद्यालयांना अनेक सोयी सुविधांची पूर्तता करावी लागते. प्रत्यक्षात सोयी सुविधांची पूर्तता करण्यास जे आर्थिक बळ लागते ते महाराष्ट्रातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अल्प संख्येमुळे मिळत नाही. त्यामुळे सोयी सुविधांची पूर्तताही अल्पप्रमाणात असलेली आपणास निदर्शनास येते.

या करीता सद्यास्थित शारीरिक शिक्षण महाविद्यालयात प्राथमिक स्वरुपाच्या सर्व सुविधा उपलब्ध आहे किंवा नाही हे पडताळुन पाहणे अत्यंत गरजेचे आहे. आणि म्हणूनच यावर संशोधन करणेही अत्यावश्यक आहे.



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner